IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महाराष्ट्रातील समाज सुधारणा आणि वृत्तपत्रे

[1]बाळू रामहरी दवणे, [2]डॉ. सय्यद एम.एम

[1]संशोधन केंद्र,
विवेकानंद कला सरदार दलिपसिंग वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.
[2]इतिहास विभाग प्रमुख,
इ.एस.पी.एम कला महाविद्यालय, बिडकीन ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*19 व्या शतकातील सामाजिक व धार्मिक सुधारणा आंदोलन आणि वृत्तपत्रे*

**ABSTRACT**

विसाव्या शतकात भारतच नव्हे, तर संपूर्ण आशिया खंडाचा इतिहासास विशेष महत्व आहे. या कालखंडात आशियातील अनेक देशात राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक पुनर्जागरण झाले. त्याला भारत अपवाद राहिला नाही. धार्मिक, सामाजिक पुनर्जागरण होत असताना, मुद्रण छपाई यंत्राच्या शोधामुळे त्यास अधिकच गती मिळाली. त्यामुळे नवनवीन धार्मिक ग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे उदयास आली. त्याव्दारे मानवी समूहाला नवीन दिशा देण्याचे कार्य वृत्तपत्राच्या माध्यमातून अधिक सोयीस्कर झाले, महाराष्ट्रातील वृत्तपत्राच्या माध्यमातून प्राचीन संस्कृतीचे पुनर्जागरण घडून आले. तर इंग्रजी शिक्षणातून आधुनिक नवमूल्य स्वीकारून, पारंपारिक समाज व्यवस्थेच्या जागी मानवतावादी, समतेच्या तत्त्वावर भारतीय समाज उभा करण्याचे कार्य, काही वृत्तपत्राच्या माध्यमातून केली जात होती.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Dawane, B. R., & Syed, M. M. (2025). महाराष्ट्रातील समाज सुधारणा आणि वृत्तपत्रे. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2055–2059.

**प्रस्तावना:**

भारताच्या इतिहासातील 18 वे शतक हे परकीय सत्तांच्या आगमन व व्यापार सत्ता संपादनाचा काळ होय. यात प्रामुख्याने पोर्तुगाल, डच, फ्रेंच व इंग्लंड, हळूहळू परक्या व्यापारी कंपन्यांनी भारताच्या राजकारणात लक्ष घालण्यास सुरूवात केली. भारतीय राज्यकर्त्यांच्या अंतर्गत दुहीचा फायदा घेऊन हळूहळू भारतीय भूप्रदेश बळकविला व भारताच्या वेगवेगळ्या भूप्रदेशावर परकीय सत्तेचे सरकारे स्थापन केली.

ब्रिटिशांनी साम्राज्य विस्तार करण्यासाठी इंग्रजांचे जुलमी व दडपशाहीचे धोरण अंगीकारले, त्यामधून भारताची प्रचंड आर्थिक लूट केली. ब्रिटिश प्रशासन सुव्यवस्थित चालविण्यासाठी त्यांनी परकीय इंग्रजी शिक्षण भारतीयांना देण्यास सुरूवात केली. भारतीयांनी आत्मसात केलेले देशी व विदेशी उच्च शिक्षण हे सामाजिक व धार्मिक सुधारणा बदल घडवून आणण्यास महत्त्वाची भूमिका निभावली. संपूर्ण देशात विशेषत इंग्रजी शिक्षणातून राष्ट्रीय जागृती होण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली. त्यामधून पुढे वेगवेगळ्या प्रांतांमध्ये सामाजिक संस्था स्थापन झाल्या, उदा.

1. ब्रिटिश इंडिया असोसिएशन असोसिएशन, 1851
2. मद्रास नेटिव्ह असेंबली, 1852
3. मुंबई बॉम्बे असोसिएशन, 1852
4. पुणे सार्वजनिक सभा, 1857 अशा अनेक संस्था स्थापन झाल्या त्यामधून पुढे 1885 मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. (आजची इंडियन नॅशनल काँग्रेस)

भारतीयांच्या हक्कासाठी चळवळी सुरू होऊन, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीस प्रारंभ झाला. 18 व्या शतकातील भारतीय समाज अंधश्रध्दा, अनिष्ट धार्मिक रूढी, चालीरिती यात बुरखडलेला होता. सामाजिक व धार्मिक जीवन अत्यंत गुंतागुंतीचे होते. पुढे 18 व्या शतकात ब्रिटिश शासन सुव्यवस्थेत चालण्यासाठी रेल्वे, जहाज, हवाई वाहतू, तार, रेडिओ यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून त्यास प्रारंभ केला. इंग्रजी शिक्षणास सुरूवात झाली. हेच इंग्रजी उच्च शिक्षण भारतात राष्ट्रवाद उदय होण्यास कारणीभूत ठरले, त्यामधून सामाजिक सुधारणेच्या प्रारंभ होऊन मुद्रण कलेच्या विकासातून विकसित झालेले वृत्तपत्राने सामाजिक परिवर्तन घडवून आनण्यास महत्त्वपूर्ण भूमिका निभवली.

**संशोधन लेखनाचा उद्देश :**

सदर संशोधनाचा उद्देश हा वसाहतवादी सत्ता भारतामध्ये स्थापन झाल्यानंतर भारत वेगवेगळ्या बदलास सुरूवात झाली. इंग्रजी शिक्षण व वृत्तपत्राच्या माध्यमातून सुधारणेच्या स्थितीचा महाराष्ट्राच्या संदर्भात अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर करण्यात आलेला असून, त्यात प्रकाशित पुस्तके, वर्तमानपत्रे व संकेत स्थळांचा समावेश करण्यात आलेला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

**महाराष्ट्रातील समाज सुधारक व त्यांचे वृत्तपत्रे :**

1. **दर्पण** : बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक हुशार विद्यार्थी होते. एल्फिन्स्टन महाविद्यालयात शिक्षक व नंतर प्राध्यापक म्हणून त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. 1832 मध्ये दर्पण नावाचे वृत्तपत्र चालू केले. या वृत्तपत्राचा उद्देश, नव्या ज्ञानाचा, पाश्चात्य विद्येचा लोकांना परिचय व त्यांचा अभ्यास व्हावा. त्याव्दारे देशातील लोकांचे कल्याण साधवे[1] या हेतूने प्रेरित होते. तसेच ते मराठी व इंग्रजी व्दिभाषिक होते.
2. **प्रभाकर** : गोविंद विठ्ठल कुंटे उर्फ भाऊ महाजन यांचा जन्म रायगड जिल्ह्यात झाला होता. त्यांनी मुंबईतील एल्फिन्स्टन विद्यालयात अध्ययन व अध्यापन केले. त्यांचा इंग्रजी, संस्कृत व फारशी भाषेचा चांगला अभ्यास होता. 1841 मध्ये त्यांनी

प्रभाकर नावाचे वृत्तपत्र काढले या वृत्तपत्रात त्यांनी आपल्या समाजात आढळणाऱ्या अनेक अनिष्ट-गोष्टीवर टीकास्त्र चालविण्यात येत असे त्याच प्रमाणे दांभिक पणावरील कोरडे ओढण्यात कधी मागेपुढे पाहिले नाही.[2]

3. **ज्ञानप्रकाश :** हे मराठी भाषेत दीर्घकाळ चाललेले 103 वर्षाचे वृत्तपत्र होय. ज्ञानप्रकाश ची मालकी व चालकत्व नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या 'भारत सेवक समाज' या संस्थेकडे विसाव्या शतकाच्या सुरूवातीस आले ते 1950 पर्यंत 14 ऑगस्ट, 1904 पासून या वृत्तपत्राचे दैनिकात रूपांतर झाले. या वृत्तपत्राने प्रामुख्याने, "वाङमय राजकारण व्यापारी वार्ता यांना वाहिलेले साप्ताहिक" असे या वृत्तपत्राच्या नावाखाली पहिल्यापणावर छापण्यात येत असे.
4. **सुधारक :** गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म सातारा जिल्हा महाराष्ट्रात झाला होता. ते थोर विचारवंत व समाज सुधारक म्हणून ओळखले जात. सुधारक हे वृत्तपत्र त्यांनी 1888 मध्ये सुरू केले. या वृत्तपत्रातून त्यांनी-व्यक्ति स्वातंत्र्य, बुध्दिवाद, स्त्री-पुरूष समानता आणि सामाजिक सुधारणेचा प्रचार केला. तसेच त्यांनी या पत्रामधून अंधश्रध्दा, बालविवाह व जाती विषमतेवर टीका करून समाज जागृतीचे कार्य केले.
5. **केसरी :** या वृत्तपत्राचे संस्थापक बाळ गंगाधर टिळक यांनी, 4 जानेवारी 1881 मध्ये सुरूवात केली. या वृत्तपत्राचा उद्देश, ब्रिटिशांच्या विरोधात भारतीय जनतेला जागृत करणे, राष्ट्रवादी विचाराचा प्रसार करणे आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्याला वाचा फोडणे हा होता.

**महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीच्या परंपरेतील वृत्तपत्रे :**

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीच्या परंपरेतील काही वृत्तपत्रे उदयास आली ती केवळ सामाजिक व धार्मिक प्रश्नावरच न थांबता, नव्या काळानुरूप बदलेल्या परिस्थितीमुळे या वृत्तपत्रांनी राजकारणाला विशेष प्राधान्य दिले. विसाव्या शतकात सत्यशोधक चळवळ थंडावली होती व तिला कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या धोरणाने चालना मिळाली.

1. **दीनमित्र :** अहमदनगर जिल्ह्यातील रावसाहेब मुकुंदराव गणपतराव पाटील यांनी 1884 मध्ये सुरू केले होते. हे वृत्तपत्र ब्राम्हाणेत्तर चळवळीतील महत्त्वाचे वृत्तपत्र होय. वृत्तपत्राची परंपरा व विचारसरणी केसरी विरोधी नव्हती. तर एक स्वतंत्र प्रवाहाची होती. या वृत्तपत्राचा उद्देश, शेतकऱ्यांच्या समस्या मांडणे आणि लोकशिक्षणाचा प्रसार करणे बहुजन समाजाच्या उध्दारासाठी आपले पत्र आहे, ही जाणीव ठेवून सतत पत्रातून लेखन केले जात असे.
2. **विजयी मराठा :** केसरी च्या परंपरेत न बसणारे सर्वस्वी भिन्न विचाराचे प्रसंगी केसरीला विरोध करणारे, महात्मा फुले, यांच्या सत्यशोधक चळवळ परंपरेतील श्रीपतराव शिंदे यांनी, हे वृत्तपत्र 1919 ला चालू केले होते. या वृत्तपत्राचा उद्देश, केवळ सामाजिक व धार्मिक प्रश्नावरच न थांबता, नव्या काळानुरूप बदललेल्या परिस्थितीमुळे या पत्रात राजकारणाला विरोध प्राधान्य राहिले.
   या पत्रात, मराठा व विद्येत मागासलेल्या वर्गाच्या उन्नती करिता राजकीय, सामाजिक, धार्मिक व शिक्षणादी विषयावर निर्भीड, मार्मिक, भारदस्त व जोरदार असे लेख प्रसिध्द होतील. अशी जाहिरात 25 नोव्हेंबर, 1919 केसरीच्या अंकात प्रसिध्द करण्यात आली होती.[3]
3. **जागरूक :** जागरूक नावाचे वृत्तपत्र 1920 मध्ये, वालचंद रामचंद कोठारी यांनी सुरू केले होते. महाराष्ट्रातील सक्रिय नेते प्रतिभाषाली विचारवंत व साहित्यिक म्हणून ओळखले जातात. या पात्राचा उद्देश, वरिष्ठ वर्गीयाकडून ज्याप्रमाणे सामाजिक समतेची मागणी ब्राम्हणेत्तर वर्ग करत होता. तशी समता खालच्या पातळीवरील अस्पृश्यानाही लाभावी. असा कोठारीचा आग्रह असत.
4. **मूकनायक :** 31 जानेवारी, 1920 मध्ये डॉ. बाबासाहेब यांनी 'मूकनायक' या नावाचे वृत्तपत्र सुरू केले होते. ते म्हणतात, बुध्दिवाद ज्यांना कबूल आहे आी वर्तमानपत्रे निघाली आहेत. हे सुदैवच म्हणायचे, दीनमित्र, जागरूक, डेक्कन रयत, विजयी मराठा, ज्ञानप्रकाश, सुबोध पत्रिका वगैरे पत्रातून बहिष्कृत वर्गाच्या प्रश्नांची चर्चा वारंवार होते. परंतु ब्राम्हणोत्तर या आवडांवर सञ्ज्ञेखाली मोडत असलेल्या अनेक जातींच्या प्रश्नाचा त्यात त्यात खल होतो. व बहिष्कृतांच्या प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह होण्यास पुरेशी जागा मिळणे शक्य नाही, हे पण उघड आहे. त्यांचा अतिविकट स्थितिशी संलग्न असलेल्या प्रश्नाची वाटाघाट

होण्यास एक स्वतंत्र पत्र पाहिजे हे कोणीही कबूल करील, ही उणीव भरून काढण्यासाठी मूकनायक या वृत्तपत्राचा जन्म झालाय.[4] पुढे डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत भारत, जनता, समता व प्रबुध्द भारत यासारखे वृत्तपत्र काढून समाजात जनजागृती करून अस्पृश्य समाजाचा आत्मसन्मान, न्याय व हक्क मिळून देण्याचा यशस्वी प्रयत्न केल्याचे दिसून येते या कार्यासाठी त्यांना वृत्तपत्राचा मोठ्या प्रमाणात उपयोग झाला.

**समाज सुधारणा :**

वसाहतवादी सरकारे स्थापन झाल्यावर, संपूर्ण भारत आर्थिक, राजकीय, धार्मिक व सामाजिक सुधारणेस वेगवेगळ्या माध्यमातून सुरूवात झाली. हे जरी खरे असले तरी समाज सुधारणा काही नवीन असे भारतीयांना नव्हते. यापूर्वी प्राचीन कालखंडापासून भारतात समाजसुधारणा अस्तित्वात होत्या. भगवान बुद्धांनी सुरू केलेली समाजसुधारणेची धुरा कबीर, महात्मा फुले, महानुभावपंथ व महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय यांच्या माध्यमातून त्या त्या कालखंडात समाज सुधारणा होतच राहिल्या. परंतु वसाहतवादी सरकार स्थापन झाले. त्यांनी आपले प्रशासन सुरळीत चालण्यासाठी इंग्रजी शिक्षणाची केलेली सुरूवात, ही समाज सुधारणेला गती देण्यास महिलाचा दगड ठरते. या इंग्रजी उच्चविद्या विभूषित पुढाऱ्यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून निश्चितच समाज सुधारणेस गती दिली.

राजा राममोहन राय 1925 मध्ये लिहितात. "हिंदूची प्राचीन धर्म व्यवस्था त्यांच्या राजकीय हितसंबंधाचे हितसंवर्धन करण्यासाठी अपुरी आहे. हे भी खेदपूर्वक नमूद करतो हिंदू मध्ये असलेल्या जातीभेदामुळे त्यांचे अनेक वर्ग व पोट वर्गात विभाजन झाले असून, त्यांची देशभक्तीची भावना हिरावून घेण्यात आली आहे."[5] राजा राममोहन राय यांच्या लेखणीतील तत्कालीन कालखंडातील भारतातील सामाजिक व धार्मिक स्थिती आपणास दिसून येते.

इंग्रजी सत्तेच्या स्थापनेनंतर भारतात उदयाला आलेला नवा माध्यमवर्ग परंपरागत, चालीरीती रूढी व शब्द प्रमान्याच्या आवर्तता अडकून न पडता आधुनिक विचार, आधुनिक जीवनमूल्य, पाश्चात्ये ज्ञान यांचा अंगीकार करण्यास सहज प्रवृत्त झाल. हा वर्ग आधुनिक विचारांच्या प्रचाराचे माध्यम ठरला.[6]

**महत्त्व आणि चर्चा :**

19 व 20 व्या विसाव्या शतकात भारतात राजकीय, सामाजिक, धार्मिक सुधारणा आंदोलने सुरू झाली या कृतीशील चळवळीचे काळजीपूर्वक निरीक्षण केले तर खालील बाबी लक्षात येते.

1. देशातील व महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व समाज सुधारकांनी तर्कविवेक आणि स्वतंत्र विचारसरणीवर भर दिला. बुध्दिवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारला हे सर्व साध्य करण्यासाठी त्यांनी उच्च शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन उच्च शिक्षणाच्या बळावर त्यांनी, सामाजिक संस्थांची उभारणी केली. वृत्तपत्रे, शाळा, महाविद्यालय सुरू करून त्यांचा समाज सुधारण्यासाठी उपयोग केला.
2. सामाजिक व धार्मिक विषमतेवर वृत्तपत्रातून, प्रबोधन करून धार्मिक, रूढी, अंधश्रध्दा, समाजातील ढोंगीपणा व वाईट प्रथेवर प्रहार करण्याचे कार्य केले.
3. सामाजिक व धार्मिक सुधारणा होत असताना, त्यामधूनच पुढे राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये प्रेरित झाली. व वृत्तपत्राच्या माध्यमातून राष्ट्रीय जनजागृती होण्यास मदत झाली. त्याशिवाय समाजामध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान जागृत होऊन देशभक्तीची जाणीव वाढ होण्यास वृत्तपत्राची भूमिका महत्त्वाची ठरली.
4. महाराष्ट्रात जी वृत्तपत्र उदयास आली होती. त्या वृत्तपत्रांना तत्कालीन सामाजिक व धार्मिक व्यवस्थेच्या चौकटीतच लेखन केले हे जरी खरे असले तरी काही वृत्तपत्रांची धार्मिक सामाजिक चौकटीच्या बाहेर जाऊन मानवतावादी दृष्टीकोनातून लेखन केल्याचे दिसते.

**निष्कर्ष :**

19 व 20 शतकात भारतीय समाज सुधारकांनी मिळविलेले भारतीय व विदेशी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून भारतीयांचा आत्मसन्मान जागृत झाला. राष्ट्रभक्ती वाढीस चालना मिळाली. त्याकरिता समाजसुधारणा, जणजागृती करण्यासाठी वृत्तपत्रांनसी महत्त्वाची व निर्णयाक भूमिका निभावली आहे. वृत्तपत्रे आपली भूमिका त्या त्या समाज घटकापर्यंत पाहोचवत असले तरीही वृत्तपत्रे माध्यम जाती धर्मात विभागली होती हे नाकारता येणार नाही. त्यासंदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात, बहिष्कृत वर्गाच्या प्रश्नांचा संगोपन उहापोह होण्यास पुरेशी जागा इतर वृत्तपत्रे देत नसून, त्याकरिता मूकनायक सारखे वृत्तपत्र उदयास आल्याचे म्हणतात. याचा अर्थ वेगवेगळ्या घटकात वृत्तपत्रे विभागलेली दिसत असली तरी त्या सर्वांमधून बुध्दीवादी, वैज्ञानिक, विचारसरणी, राष्ट्रभक्ती आणि मानवतावादी दृष्टीकोनास चालना मिळाली.

**संदर्भ सूची :**

1. https:/vishawakosh.marathi.fov.in 9/12/2015
2. रा. के. लेले. मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॅन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2004 पू. क्र. 77
3. उपरोक्त पृ. क्र. 560, 568
4. संपादन, वसंत मून, मूकनायक, प्रकाशन, शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, 1990 अंक पहिला.
5. बिपिन चंद्र व इतर, भारत का स्वातंत्र संघर्ष, हिंदी माध्यम कार्यान्वये निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, 2005 पृ. क्र. 45
6. सुमन वैद्य व शांत कोटेकर, आधुनिक भारताचा इतिहास, 1757 ते 1857 साईनाथ प्रकाशन, नागपूर. 2002 पृ. क्र. 247